# उच्च माध्यमिक संच मान्यता  शिक्षक मान्यता

## अ) शिक्षक /शिक्षकेतर सेवकनिश्चिती व मान्यता

पट पडताळणी व सेवक संच निश्चितीबाबत सी. डी. मध्ये माहिती देताना याबाबत निकष पुढीलप्रमाणे राहतील तसेच नियुक्ती मान्यतेबाबत प्रस्ताव पूर्वीप्रमाणे सादर करण्यासाठी निकष पुढीलप्रमाणे राहतील.

१. ऑगस्ट पटसंख्येनुसार दरवर्षी सेवक संच निश्चित करुन आवश्यक आहे.

२. कार्यभार परिगणना

शासन / म.रा.मा. /उ.मा.शि. मंडळाने विहित केल्यानुसार तासिकांचे वाटप पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं. | विषय | शाखा निहाय तासिका | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | | वाणिज्य | | विज्ञान | | |
| | | अध्यापक | स्वाध्याय | अध्यापक | स्वाध्याय | अध्यापक | स्वाध्याय | प्रात्यक्षिक |
| १. | भाषा | ४ | १ | ४ | १ | ४ | १ | - |
| २. | वैकल्पिक विषय | ६ | - | ६ | - | ६ | - | - |
| ३. | भोतिक/रसायन/जीव | - | - | - | - | ४ | १ | ३ |
| ४. | भुगोल व गणित | ८ | - | ८ | - | ८ | - | - |
| ५. | शारीरिक शिक्षण/पर्यावरण | २ | - | २ | - | २ | - | - |
| ६. | माहिती तंत्रज्ञान | ५ | ३ प्रॅक्टीकल | ५ | ३ प्रॅक्टीकल | ५ | - | ३ |

३. स्वाध्याय तासिका ४०/६० विद्यार्थ्यांचा गटास १ याप्रमाणे मान्य करता येतील.

प्रात्यक्षिकाकरिता २० विद्यार्थ्यांचा गट (Batch) असावा.

४. वैकल्पिक विषयांचा कार्यभार विचारात घेताना (एकाच इयत्तेच्या एकापेक्षा जास्त तुकडया) एकत्रित विद्यार्थी संख्या विचारात घऊन कार्यभार निश्चित करावा. (उदा.इ.११ वी च्या अ,ब,क व ड अशा चार तुकडया असून अ-२५, ब-३५,क-४० व ड-२३ अशी विद्यार्थी संख्या एकाच विषयाकरीता असल्यास या प्रत्येक तुकडीचा कार्यभार न मोजता (अ+ब) (क+ड) असा कार्यभर

मोजून निश्चित करावा.) वैकल्पिक विषय सुरु करण्यासाठी किमान विद्यार्थी संख्या २० आवश्यक आहे.

५. सेवक संच निश्चितीकरता सादर करावयाची कागदपत्रे

१. तुकडया व विद्यार्थी संख्या (प्रपत्र) मंजूरी पत्रासह. (अनुदानीत / अंशतः अनुदानीत / विनाअनुदानीत / कायम विनाअनुदानीत)

२. कार्यभार परिगणन तक्ता

३. गतवर्षाच्या कार्यभार निश्चिती व मान्यता पत्राच्या प्रती पुरवणी मान्यतेसह.

४. विषयनिहाय विद्यार्थी संख्या.

५. कायम शिक्षकाचा कार्यभार बदलू नये.

६. कायम शिक्षकास १७,१८,१९ घडयाळी तासाकरिता कमी पडत असलेला कार्यभार पर्यावरण विषयाचा प्रथम देवून नंतर माध्यमिक / वरिष्ठ महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेबाबाबत प्राचार्यांनी खात्री करावी. कार्यभार शिल्लक असलेबाबत वरिष्ठ महाविद्यालयाच्या बाबतीत सक्षम अधिका-यांचे पत्र प्रस्तावाबाबत जोडणे आवश्यक आहे.

७. सर्व शिक्षकांना प्रथम पुरेसा कार्यभार देवून फक्त शेवटच्या शिक्षकास माध्य किंवा वरिष्ठ महाविद्यालयाकडील कार्यभार देण्यात यावा.

८. सन २००९-२०१० मधील अद्यावत वेळापत्रक

ब) कार्यभार निश्चितीनंतर पद अतिरिक्त ठरणे

कमी प्रवेश / तुकडी बंद होणे / विषय बंद होणे इ. मुळे कार्यभार कमी होणे व परिणामी शिक्षक अतिरिक्त होत असल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. विषय निहाय शिक्षकांची सेवाज्येष्ठता विचारात घ्यावी. मागासवर्गीय प्रमाण विचारात घेऊन महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवच्या शर्ती) नियमावली

१९८१ मधील नियम क्रमांक २६ व २७ नुसार अतिरिक्त शिक्षकांचे नाव घोषित करावे.

२. अतिरिक्त ठरणा-या कर्मचा-यांचे समावेशन प्रथम संस्थांतर्गत करण्याचा प्रयत्न करावा. संस्थांतर्गत समावेश शक्य नसल्यास अतिरिक्त शिक्षकाचे नांव, विषय इ. तपशील शिक्षण उपसंचालक कायार्सलयास कळवावा.

३. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकाचे नांव १५ जुलै पूर्वी शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावे. अशा अतिरिक्त शिक्षकांची नावे मुदतीत न कळविल्यास सदर शिक्षकांच्या वेतनाची जबाबदारी संबंधीत संस्थे्ची रााहील.

४. अतिरिक्त शिक्षकांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधित शिक्षकाचे वेतन संस्थे्च्या वेतनेतर अनुदानातून वसूल करण्यात येईल.

अतिरिक्त शिक्षकाचे नांव या कार्यालयास कळविल्यानंतर संबंधित शिक्षकाचे वेतन त्यांचे समावेशन पूर्ण होईपर्यंत मूळ आस्थापनेवरुन अदा होईल याची नोंद घ्यावी.